
# 'माझी कल्पक आई'



डॉ. जयंत नारळीकर, आई व वडिलांसमवेत

'ज्यांच्याकडे बाळपणाच्या सुखद स्मृती आहेत, त्यांना त्यामागे आपल्या आईचा सिंहाचा वाटा दिसून येतो. अशा भाग्यवंतांत मी आहे...'
आपल्या उच्चशिक्षित, सुसंस्कारी, अतिशय कल्पक आईविषयीच्या आठवणी सांगत आहेत ज्येष्ठ शास्त्रज्ञ

जयंत नारळीकर

"ताई, तू खराब आयांत फर्स्ट येशील!"

जवळजवळ चार तपांपूर्वी तीन भाषांच्या मिश्रणात माझ्या धाकट्या भावाने आमच्या आईला दिलेले हे 'सर्टिफिकेट' आज डोळ्यांपुढे येते. मुलांना लहानपणी वळण लावण्याचे काम आईबापांचे- दोघांचे असले तरी प्रत्यक्षात 'हे कर', 'ते करू नको' हे मुलाला सांगण्याचे अप्रिय काम आईलाच करावे लागते. आणि जी आई आपले हे कर्तव्य जागरूकतेने बजावते, तिला आपल्या मुलांकडून अशा तऱ्हेचे सर्टिफिकेट मिळाल्याशिवाय राहत नाही.

पण आई केवळ अप्रिय कामेच करत नसते!

'ते हि नो दिवसाः गताः'- गेले आमचे दिवस- अशा अर्थाचा श्लोकाचा भाग भवभूतीच्या 'उत्तररामचरिता'त आहे. वनवासातून परत आल्यावर, अयोध्येत राज्य करत असताना रामाला आपले बालपण आठवते. आपल्या पूर्वीच्या जीवनावर आधारित चित्रे पाहताना रामाच्या तोंडी वरील उद्गार आहेत. परंतु तो श्लोकाचा संबंध ओळ अशी आहे-

मातृभिश्चिन्त्यमानानां

ते हि नो दिवसाः गताः।

राम लक्ष्मणाला म्हणतो, "आपल्या आया आपली काळजी घेत होत्या असे आपले गेले ते दिवस."

सर्वांचेच बाळपण सुखाचे नसते; परंतु ज्यांच्याकडे बाळपणाच्या सुखद स्मृती आहेत, त्यांना त्यामागे आपल्या आईचा सिंहाचा वाटा दिसून आल्यास आश्चर्य नाही. अशा भाग्यवंतांत मी आहे.

आपल्या मुलांना सुख आणि आराम देण्यासाठी अविरत झटत राहणे हा आईचा स्वभाव असतो. त्याचबरोबर मुलांनी शिकून शहाणे व्हावे, त्यांना चांगले वळण लागावे, त्यांनी खऱ्या अर्थाने 'मोठे' व्हावे, हीही तिची इच्छा असते. लाड आणि शिस्त या दोन्हींना सांभाळून मार्ग काढणे ही तारेवरची कसरत आईला करावी लागते. ही कसरत सर्वांनाच जमत नाही. माझ्या आईने- ताईने या कसरतीचे उत्तम प्रात्यक्षिक करून दाखवले. माझ्या लहानपणाकडे दृष्टी टाकली की लाड आणि शिस्त, दोन्हींच्या आठवणी मनात गर्दी करतात. त्या आठवणींवर आधारलेला हा लेख आहे.


आयुष्यात मागे मागे गेले की आठवणी पुसट होत जातात. पाच वर्षे वयापूर्वीच्या आठवणी तर फारच थोड्या! कधी कधी अशी शंका येते, की या खुद्द आपल्या आठवणी आहेत, का नंतर आपल्याला सांगण्यात आलेल्या ऐकीव स्वरूपाच्या गोष्टी आहेत? पण जिच्याबद्दल अशी शंका नाही, अशी एक आठवण आहे, ती ताईच्या तोंडून ऐकलेल्या तुकारामांच्या अभंगांची. गृहकृत्ये करताना किंवा रात्री आम्हा दोघांना झोपवताना ताईने गुणगुणलेले अभंग आजही स्मृतिपटलावर आहेत. त्या काळची 'ऐकीव' स्वरूपाची एक आठवण.

आमचे बाळपण बनारसमध्ये गेले. उत्तर हिंदुस्थानी हिवाळ्यात मोठी माणसे शाली वापरून थंडीला तोंड देत; पण लहानांचे काय? खेळता-बागडताना शाली काय कामाच्या? परंतु ताईने त्यावर ही युक्ती काढली. सेफ्टी पिना वापरून तिने शाली आमच्या अंगावरून न पडतील अशा लावून दिल्या. त्या 'पांघरून' इकडेतिकडे पळताना आम्ही दोघे रोमन सिनेटरांसारखे दिसत असू म्हणे! प्रख्यात लेखक आणि मराठीचे प्राध्यापक मा. दा. आळतेकर त्या वेळी अनेकदा बनारसला येत. त्यांनी ही शाल गुंडाळण्याची पद्धत पाहून ताईला म्हटले, "तुम्ही या पद्धतीचे पेटंट घ्या!" लहानपणी आम्हाला संस्कृत श्लोक पाठ करायला सांगण्यात आले. साहजिकच आम्हाला अभ्यासाव्यतिरिक्त हे वेगळे काम नको होते. पण वडिलांनी मधाचे बोट लावले- गीतेच्या श्लोकागणिक एक चांदीचा रुपया मिळेल. सहाव्या जॉर्जचा चेहरा असलेले त्या वेळचे काही 'मिळकती'चे रुपये आम्ही अजून जपून ठेवले आहेत. अर्थात आमच्याकडून 'धर्मक्षेत्रे कुरुक्षेत्रे' पाठ करवून घेण्याचे काम ताईनेच उत्साहाने केले.

माझ्या धाकट्या भावाला तिसरीत 'डबल प्रमोशन' मिळाले. त्या वेळी त्याच्याकडून दोन वर्षांचा अभ्यास एका वर्षात करवून घ्यायचे काम अर्थातच ताईकडे आले. आमच्या शालेय जीवनात पाठ्यक्रमावर आधारलेली प्रश्नपत्रे काढून, तपासून आमचा अभ्यास नीट चालू आहे, याची खात्री करून घेण्याचे काम ताईचेच! माझ्या वडिलांनी शालेय पाठ्यक्रमाच्या मर्यादेपलीकडे गणितात रुची वाढावी म्हणून मला गणितावरील मनोरंजक लेखनाची ओळख करून दिली, तर ताईने शालेय अभ्यासावर नजर ठेवली. शाळेत संस्कृत शिकवायला सुरवात झाल्यावर घरी 'रघुवंशा'सारख्या संस्कृत ग्रंथांची ओळख करून द्यायची कल्पना ताईचीच. मॅट्रिकनंतर विद्यापीठातील शिक्षणात मला संस्कृत विषय घेता येत नाही, म्हणून खरोखर वाईट वाटले. याचे कारण ताईने संस्कृतबद्दल माझ्या मनात निर्माण केलेली गोडी.

अभ्यासाप्रमाणे खेळावरही ताईची नजर असे आणि कल्पकता दाखवून तिने वेळोवेळी खेळांची साधनेही आम्हाला पुरवण्याची तरतूद केली. बनारसमधील आमच्या घरात जागेची टंचाई नव्हती. घरातील प्रशस्त अंगणात कधी कधी 'पडद्यांचे घर' बांधून आम्हाला तंबूत राहिल्याची गंमत अनुभवायला मिळे. एकदा डोंबाऱ्याचा खेळ पाहिल्यावर त्यांच्यासारखे पायाला काठ्या बांधून चालता येईल का, असे आम्हाला वाटले. लगेच ताईने सुताराला बोलवून काठ्यांना जमिनीपासून दीड फुटावर पाय ठेवायला लाकडी फळ्या (पादुकांसारख्या) जोडून घेतल्या. त्यावर पाय ठेवून आणि काठ्या हातात धरून आम्ही इकडेतिकडे फिरू लागलो, जिने चढू-उतरू लागलो. शेजारच्या घरात बागेत कॉंक्रिटची घसरगुंडी होती. ती उन्हात अतिशय गरम होत असे. ताईने आमच्या घरी लाकडी घसरगुंडी करवून घेतली. आम्हाला अभ्यासाकरता आणि करमणुकीकरता घरातील भिंतीवर फळे करून देण्यात आले, या सर्व ताईच्या कल्पक डोक्यातून निघालेल्या करामती!

हेच कल्पक डोके घरातील सुखसोयी वाढवण्यात अनेक वेळा अनेक प्रकारे वापरले गेले. त्या सर्वांची दखल घेतल्यास एक वेगळाच लेख तयार होईल. येथे फक्त काही निवडक उदाहरणे देतो. घरात रेफ्रिजरेटर नव्हता. मग गार पाणी कसे ठेवायचे? पाणी उकळून पिण्याची पद्धत होती. त्यात बाजारातला बर्फ घालून चालणार नव्हते. बनारसच्या उन्हाळ्यात मातीच्या सुरयांत पाणी ठेवण्यात येई; पण ते पुरेसे गार नसे. त्यावर ताईची युक्ती अशी, उभ्या पितळेच्या डब्याभोवती कापूस भरलेल्या कापडांचे अभ्रे घट्ट बसतील असे करवून घ्यायचे. त्या थैलीसारख्या अभ्र्यांभोवती पुन्हा कापडाचे आवरण. डब्यात बर्फ आणि त्या बर्फात पाण्याने भरलेले भांडे. हे सर्व परत एका कापडाच्या थैलीने झाकायचे. त्या थैलीतसुद्धा कापूस भरलेला. अशा प्रकारे पाणी बराच वेळ गार राही. याच थैल्या हिवाळ्यात गरम केलेले अन्न लवकर गार होऊ नये म्हणून उपयोगी पडत. अशाच थैल्यांत उकळत्या पाण्याचे पातेले ठेवून त्यावर सांडगे-मिरच्याही वाळून निघत. घराच्या छतावर किंवा अंगणातील वाळवणांना धुळीचा, पक्ष्यांचा तडाखा बसतो तो अशा तऱ्हेने वाचतो.



'ताई'चे रोजचे भागवत वाचन.
शेजारी वडील विष्णूपंत नारळीकर

हिवाळ्यात घरातील माणसांना किंवा येणाऱ्या पाहुण्यांना घरापेक्षा बाहेर उन्हात बसायला आवडे. त्यांच्या सोयीसाठी ताई अंगणात योग्य ठिकाणी बैठकीची व्यवस्था करीत असे. फळांची साले काढताना आपण सालांकडे दुर्लक्ष करतो. ताईचे तसे नव्हते. सफरचंदाचे साल काढताना तिला पाहावे. वरून सुरवात करत स्प्रिंगप्रमाणे सबंध साल न तुटता काढण्यात तिचा हातखंडा होता. तिचा 'सोपा केलेला जरदाळू' असा आहे- जरदाळूच्या सालाचे दोन भाग करायचे. त्यातील बदाम आवरण फोडून काढायचा आणि परत त्या सालांत घालून द्यायचा. म्हणजे खाणाऱ्याला काही कष्ट करायला नकोत!

बनारसच्या हिवाळ्यात अंघोळ अर्थात गरम पाण्याने; पण अंघोळ झाल्यावर कपडेसुद्धा गरमागरम घालायला मिळाले तर? त्या दृष्टीने ताईने बाथरूममध्ये एक शेगडी ठेवून, त्यावर जाळी ठेवून त्या जाळीवर कपडे ठेवण्याची सोय केली. मोठ्या हॉटेलात गरम गरम पदार्थ बश्यांतून मिळतील अशी सोय करण्यात येते. पण गरम पाण्याच्या अंघोळीनंतर गरमागरम कपडे घालायला मिळावेत, ही सोय मी इतरत्र कुठेही पाहिली नाही.

अर्थात अशा तऱ्हेच्या सुखसोयींमुळे आम्ही दोघे 'ऐदी' बनत चाललो यात आश्चर्य नाही. पण आमच्या ऐदीपणास योग्य वेळी आळा बसला. एकदा आमच्याकडे गायनाचार्य (कै.) पं. नारायणराव व्यास आले. त्यांनी पाहिले, की ही मुले स्वतः काहीच करत नाहीत. आईच त्यांच्या सुखसोयींसाठी खपतेय. त्यांनी आम्हाला 'स्वावलंबी व्हा' असे आवाहन केले, आणि ताईलाही सांगितले, "तुम्ही मुलांना स्वतःची कामे स्वतः करायला उद्युक्त करा. तुम्ही त्यांच्यासाठी फार खपता." ताईने त्यांचा सल्ला थोडाफार अमलात आणला. व्यासांची इच्छा अशी, की आम्हाला पिठले-भात तरी करता आला पाहिजे. माझी मजल फक्त चहा-कॉफीपर्यंत गेली. खरे स्वावलंबन मी मातृछायेपासून लांब परदेशात गेल्यावरच शिकलो.

पण आम्ही मोठे व्हायला लागल्यावर आपल्याला थोडा मोकळा वेळ मिळतोय याची ताईला जाणीव झाली. त्याच सुमाराला ताईचे पूर्वाश्रमीतले संगीताचे शिक्षक गायनाचार्य (कै.) वामनराव पाध्ये बनारसच्या म्युझिक कॉलेजमध्ये शिकवायला आले. त्यांच्या आग्रहावरून ताईने एसराज हे वाद्य वाजवायला शिकायला सुरवात केली. हे वाद्यवादन बनारसमध्ये पाध्येबुवांच्या मार्गदर्शनाखाली, नंतर अजमेरमध्ये श्री. मावळंकर आणि पुढे पुण्याला श्री. दातार यांच्या शिकवणीखाली चालू होते. नंतर १९९४ पर्यंत स्वयंस्फूर्तीने चालू राहिले. संथ सुरात आळवलेल्या या गीतांनी ऐकणाऱ्याला मनःप्रसाद मिळत असे.

ताईने लहानपणापासून आम्हा दोघांना असंख्य गोष्टी सांगितल्या. बहुतेक आयांची मजल 'काऊ, चिऊ'पर्यंत असते. काही पौराणिक कथांपर्यंत जाऊन पोचत असतील, तर काही परीकथांपर्यंत. ताईने हे सर्व पल्ले ओलांडून 'उषःकाल', 'सूर्योदय'सारख्या मराठी ऐतिहासिक कादंबऱ्या आणि माझ्या वडिलांनी सुचवलेल्या कॉनन डॉयल, सॅपर, जेकब्स, मार्क ट्वेन इत्यादी लेखकांच्या इंग्रजी वाङ्मयातल्या गोष्टी

(पान ६ पाहा)

(पान ३ वरून)

# 'माझी कल्पक आई'



केंब्रिजमध्ये पीएच. डी मिळाली, त्यादिवशी ( डावीकडून ) वडील, आई व भाऊ अनंत यांच्यासमवेत डॉ. जयंत नारळीकर.

मराठीत सांगितल्या. शेवटी वडिलांनाच परत सांगावे लागले, "स्वावलंबी व्हा ! असल्या गोष्टी स्वतः वाचा."

ताईचा जन्म कोल्हापुरात हुजूरबाजारांच्या घरी १९१२ मध्ये झाला. तिचे बालपण हुजूरबाजार वाड्यात गेले. प्राथमिक शिक्षण कोल्हापूरच्या न्यू स्कूलमध्ये आणि नंतरचे राजाराम कॉलेजात झाले. तिने मुंबई विद्यापीठातून संस्कृतमध्ये एम. ए. ची डिग्री घेतली. त्या वेळी एम. ए. पर्यंत शिकणाऱ्या मुली फारच कमी होत्या. १९३७ मध्ये पूर्वाश्रमीच्या कृष्णाताई हुजूरबाजार सुमती विष्णुपंत नारळीकर झाल्या आणि माझे वडील विष्णुपंत नारळीकर यांच्याबरोबर बनारसमध्ये राहायला गेल्या. त्या वेळी तिचे संस्कृतमधले पांडित्य पाहून बनारस हिंदू विद्यापीठातील प्रा. बेलवलकर यांनी डॉक्टरेटसाठी ताईने अभ्यास करावा असे सुचविले. परंतु ताईने शिक्षण पुढे चालू ठेवण्यापेक्षा गृहिणी व्हायचे पत्करले. तरीदेखील संस्कृतचे वाचन आणि थोडेफार संशोधनदेखील चालू ठेवले. पुढे ताईने अनुरूप प्रसंगी व्याख्याने द्यायची निमंत्रणे स्वीकारायला सुरवात केली. हिंदी, मराठी, इंग्रजी आणि संस्कृत या चारही भाषांवर तिचे प्रभुत्व असल्याने बनारस, अजमेर, पुणे आणि मुंबई या सर्व ठिकाणी वेगवेगळ्या श्रोतृसमुदायापुढे अनेक विषयांवर ताईची भाषणे झाली आहेत. आपल्या सोप्या शैलीमुळे आणि प्रगल्भ विचारांमुळे ती सर्वसाधारण सुशिक्षित श्रोत्यांना आवडतात. विशेषकरून संस्कृतमध्ये सोप्या, पण प्रवाही भाषेत आधुनिक विषयांची चर्चा करता येते, हे ताईच्या भाषणांवरून दिसून येते.

ताईच्या संस्कृतमधील व्याख्यानांचे एक पुस्तक 'सुमतिदर्शन' या नावाने वाराणसीत प्रसिद्ध झाले. त्यामध्ये सोप्या संस्कृत भाषेत अनेक विषयांचा ऊहापोह केलेला आहे. त्यात महाकवी कालिदास, दयानंद सरस्वती, स्वामी विवेकानंद यांच्याबद्दल व्याख्याने आहेत, तसेच विज्ञानातील नवनवीन शोधांवर आणि संस्कृत भाषेच्या माहात्म्यावरदेखील चर्चा आहे. ही व्याख्याने ऐकताना आपण बोली भाषेतील संस्कृत ऐकतो आहोत असे वाटते. वाराणसीत जवळजवळ तपाचा काळ काढल्यावर ताई माझ्या वडिलांच्या बरोबर अजमेरला गेली. तेथून पुण्याला, नंतर मुंबईला आणि नंतर परत पुण्याला, असे स्थित्यंतर झाले. परंतु या सर्व स्थित्यंतरामध्ये ताईने सतत आपल्या परिवारातील मंडळींना सर्व दृष्टींनी सांभाळून घेतले, असे म्हणायला हरकत नाही. १९९१ मध्ये माझ्या वडिलांच्या मृत्यूनंतर ताईच्या जीवनात एक मोठी पोकळी निर्माण झाली. त्या वेळी मी असे सुचविले, की तिने माझ्या वडिलांच्या आठवणी लिहून काढाव्यात. या आठवणी आता 'कहाणी एका रँगलरची' या एका लहानशा पुस्तकाच्या रूपाने वाचायला मिळतात.

१९७२ मध्ये मी केंब्रिजहून भारतात परतलो आणि मुंबईत टाटा इन्स्टिट्यूटच्या परिसरात स्थायिक झालो. त्या वेळी माझे आईवडील आमच्याकडे राहायला आले. माझ्या मुलींनी ताईचे नाव बदलून 'ताजी' केले. ताईची 'ताजी' झाली तरी तिच्यात तेच गुण होते, तोच उत्साह होता. घरातल्या सर्वांची सोय पाहण्याची प्रवृत्ती पहिल्यासारखीच होती, हे सर्व आज प्रकर्षाने जाणवते. कारण आजकालच्या धकाधकीच्या जीवनात आणि विभक्त कुटुंबांमध्ये अशा तऱ्हेचे अनुभव मिळणे कठीणच.